# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८
## मा.इ प्रभाग समिति
## कार्यपत्रिका क्रमांक - ९
## सभावृत्तांत

**दिनांक - ०७/१२/२०१८** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक - ७/१२/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.भिमाबाई पोपट फुगे – **अध्यक्षा**

२) मा.सुवर्णा विकास बुर्डे

३) मा.श्री.डोळस विकास हरिचंद्र

४) मा. श्री उंडे लक्ष्मण धोंडू

५) मा. घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन

६) मा.गायकवाड निर्मला मनोज

७) मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी

८) मा.बारसे प्रियांका प्रविण

९) मा.श्री.अजित दामोदर गव्हाणे

१०) मा.श्री.संतोष आण्णा ज्ञानेश्वर लोंढे

११) मा.श्री.लांडे विजय नामदेव - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी, श्री. एस. एच. भोसले- प्र.प्रशासन अधिकारी, श्रीम.शिनकर पी.पी.उपअभियंता (स्थापत्य), श्री.शिंदे एस.जी. – उपअभियंता (नगररचना), श्री.राजेंद्र शिंदे - उपअभियंता (स्थापत्य), श्री.विजय जाधव- उपअभियंता (स्थापत्य/उद्यान), श्री.वहीकर एस.एस.प्र.उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.संजय साळी-उपअभियंता (बीआरटीएस), श्री.गनबोटे ए.पी. - क.अभियंता (स्थापत्य), श्री.पांचाळ बी.के. क.अभियंता (स्थापत्य), श्रीम.पोतदार व्ही.एच. - क.अभियंता (स्थापत्य), श्री.राऊत व्ही.एस. – क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.कातोरे पी.बी. - कनिष्ठ अभियंता (विद्युत), श्री. व्ही. एम. ताकवले - कनिष्ठ अभियंता (स्थापत्य), श्री.व्ही.जी.जगताप – स्था. अ.स.(पाणीपुरवठा), श्री.प्र.रा.तावरे – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.कोतकर पी. क.अभियंता, (पाणीपुरवठा) श्री.बेळगांवकर एस.एस.- क.अभियंता, (पाणीपुरवठा), श्री.कुतवळ एस.यु.-क.अभियंता, (ज.नि.), श्री.संदीप ठोकळे.- क.अभियंता (ज.नि.), श्री.शेलार ए.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.डी.डी.सटाणे- उद्यान सहाय्यक, श्री.कोंढरे- एस.आर. – अतिक्रमणपथक प्रमुख (अतिक्रमण), श्री.लांडगे एस.एन.मुख्यलिपिक (अतिकमण), श्री.साळुंके जे.जे.- मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री.गायकवाड पी.आर.-मुख्याध्यापक- माध्यमिक विद्यालय,लांडेवाडी, श्रीम.भोज – जे.एस. - क्रीडा पर्यवेक्षक, श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक, -------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.** ------

**विषय क्रमांक -१**.मौजे डुडूळगांव ता.हवेली मधील गट नं. १९० मधील वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील१८.मी.व २४ मी.रुंद रस्त्याने बाधीत ०.७७४ हेक्टर वनजमिन महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेबाबत नगररचना व विकास वभागाकडील पत्र क्र. नरवि/कावि/१५/४१८/२०१८, दि.३०/११/१८ चे पत्र.

**विषय क्रमांक -२**. प्रभाग क्र.५ मधील बॅडमिंटन हॉलला श्री.छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल असे नामकरण करणेबाबत.मा.सौ.प्रियांका प्रविण बारसे यांचे जा.क्र.१२० दिनांक ०४/१२/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक-३** प्रभाग क्र.४ दिघी-बोपखेल मधीलबोपखेल स्मशानभुमी मधील मोडकळीस आलेले FRP Toilet unit निष्कासित करणेबाबत.मा.सौ.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे दिनांक ०७/१२/२०१८ रोजीचे पत्र.

**विषय क्रमांक-**४ प्रभाग क्र.३ मोशी येथील पुणे-नाशिक ते गट क्र. ५० कडे जाणारा रस्त्यास शिवाजीवाडी मार्ग क्र. २ असे नामकरण करणेबाबत.मा.सुवर्णा विकास बुर्डे दिनांक ०७/१२/२०१८.

**विषय क्रमांक -५** प्रभाग क्र. ५ मधील आरक्षण क्र. ३९८ खेळाचे मैदान व १२.०० मी रुंद रस्त्यास येणारे बांधकाम निष्कासित करणेबाबत.मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी, मा.श्री.अजित गव्हाणे, व मा.सौ.प्रियांका बारसे यांची दिनांक ०७/१२/२०१८ ची पत्रे.

.

-------

अ) दिनांक ०२/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ८)
सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

ठराव क्रमांक - **२५** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०७/१२**/२०१८

सूचक- मा.सौ. प्रियांका बारसे अनुमोदक–मा. घुले नानी उर्फ हिराबाई

संदर्भ - प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय, "**पैसे द्या व वापरा** "या तत्वावर देणेबाबत. स्थापत्य विभागाकडील पत्र क्र. इ/स्था/कावि/१११५/ २०१८, दिनांक २३/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.५ मधील सखुबाई उद्यानाजवळील शौचालय इमारत पैसे द्या व वापरा तत्वावर मे.सुविधा इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी देणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी इ क्षेत्रीय कार्यालय यांनी शिफारस केली आहे तरी सदर शौचालय मे.सुविधा इंटरनॅशनल सोशल सर्व्हीस ऑर्गनायझेशन या संस्थेस देखभाल दुरुस्तीसाठी ३० वर्षे देणेकामी मा. इ प्रभाग समितीची प्रशासकीय मान्यता घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - **२६** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०७/१२/२०१८**

संदर्भ - प्रभाग क्रमांक ५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे नामकरण करणे बाबत

दिनांक०७/१२/२०१७ चे पत्रान्वये इ क्षेत्रीय (प्रभाग समिती) मासिक सभेत दिनांक ०७/१२/२०१७ रोजी ऐनवेळचा विषय मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने दाखल करुन घेण्यात आला होता. सदरचे सभेत प्रभाग क्र.०५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे बॅडमिंटन हॉल असे नामकरण करण्याबाबत ठराव क्रमांक २१ दिनांक ०७/१२/२०१७ अन्वये मंजूर करण्यात आला आहे. सदरचा ठराव दिनांक ०४/०१/२०१८ चे मासिक सभेत कायम करण्यात आला आहे. तथापि प्रभाग क्र.०५ अ चे नगरसेवक श्री.सागर बाळासाहेब गवळी यांनी दिनांक ०७/०२/२०१८ चे पत्रान्वये सदरचे बॅडमिंटन हॉलचे नावात फेरबदल करावयाचा असलेने नाव देण्याची अंमलबजावणी करण्यात येऊ नये असे कळविले आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ चे १ (र) अन्वये महानगरपालिकेने पारित केलेल्या कोणत्याही ठरावात तो पारित झाल्यानंतर तीन (३) महिन्याचे आत फेरबदल करता येणार नाही किंवा तो रद्द करता येणार नाही. मात्र अशा ठरावात एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी एक द्वितीयांश (१/२) पालिका सदस्यांनी किंवा कोणत्याही विवक्षीत बाबतीत या अधिनियमान्वये आवश्यक असेल अधिक संख्ये इतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल. किंवा तो रद्द करता येईल. खंड (ह) मधील आवश्यक गोष्टी पुर्ण करुन अशा सभेची नोटीस देण्यात आली असली पाहिजे. आणि अशा नोटीशीत ज्या ठरावात अशा सभेत फेरबदल करण्याचे किंवा तो रद्द करण्याचे योजीले असेल तो ठराव आणि अशा ठरावात फेरबदल करण्यासाठी असलेली सूचना किंवा प्रस्ताव पुर्णपणे नमूद केला पाहीजे. सदर विषयाबाबत नियमाधीन कार्यवाहीसाठी सभेपुढे ठेवण्यात यावे.

--------

**मा.प्रियांका बारसे –** बॅडमिंटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करणेबाबतच्या विषयाला माझा पुर्ण आक्षेप आहे. बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे बॅडमिंटन हॉल असे नामकरण करण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला आहे. सदरचा ठराव मासिक सभेत कायम करण्यात आला आहे. असे असताना पुन्हा नामकरणाचा विषय कसा आला आहे. इतका दिवस तो विषय कसा राहिला.

**मा.सागर गवळी –** सन्मा. सभापती मॅडम या ठिकाणची जागा आहे ती गवळी कुटुंबियाची जागा आहे. त्यांनी ती बॅडमिंटन हॉलकरता दि लेली असल्यामुळे त्यांच्या कुटुंबाच्या व्यक्तीचे नाव देणे योग्य आहे.

**मा.प्रियांका बारसे-** मी आतापर्यंत एकच ठराव मांडला आहे. मी आतापर्यंत कुठलाच नावाचा प्रस्ताव, ठराव केला नाही. मी सुध्दा भोसरीत राहात आहे. मला येथील सर्व माहिती आहे. मी बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे बॅडमिंटन हॉल असे नाव देण्याचा ठराव दिल्यानंतरच त्यांना नाव देण्याची का आठवण झाली?

**मा.सागर गवळी –** मला याबाबत वाद घालायचा नाही. केवळ गवळी कुटुंबियाची ती जागा आहे. त्या ठिकाणी त्यांचे नाव लागले पाहिजे एवढाच माझा उद्देश आहे. त्या व्यक्तींची जागा महापालिकेत गेलेली आहे. याबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी स्पष्टीकरण केले तर बरे होईल.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** नामकरणाबाबत यापुर्वी  काय केले ते मला माहित नाही.  यापुर्वी जे तात्कालीन अधिकारी होते त्यांनी विलंब का लावला याबाबत काहीही माहित नाही. मी चार्ज घेतल्यानंतर त्यानुसार आपल्याला लेखी कळविले आहे.

**मा.प्रियांका बारसे -** हा विषय मंजूर झाला होता का? मंजूर झाला असेल तर मला माहित पाहिजे. दिनांक ७/१२/२०१८ च्या मासिक सभेमध्ये हा विषय मंजूर झालेला आहे. आता नव्याने हा विषय आलेला आहे.  माझा या विषयाला आक्षेप आहे. आता नुकतेच मी इमेलवरुन पत्र दिले आहे. त्यामध्ये बॅडमिंटन हॉलला छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल असे नामकरण देण्यात यावे असे लिहिले आहे ते नाव देण्यात यावे.  दोन्ही नाव न देता छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल असे नाव योग्य वाटते.

**मा.सागर गवळी –** यापुढे महापालिकेमध्ये एखादे मोठे प्रोजेक्ट राबविले तर त्यास छत्रपती शिवाजी महाराज नामकरण करण्यात यावे. बॅडमिंटन हॉलला एवढया मोठया महान महापुरुषाचे नाव देण्यापेक्षा कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करणेत यावे.  कारण सदरची जागा गवळी कुटुंबियांनी दिलेली आहे. स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्याच्या भावनेने त्यांनी दिलेल्या जागेबद्दल ऋण व्यक्त करुन बॅडमिटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करण्यात यावे. मला वाटते याबाबत अधिका-यांशी चर्चा करुन हा विषय मार्गी लावावा. माझे असे म्हणणे आहे की, मतदान घेण्यात यावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** कार्यपत्रिका क्रमांक ०५ ठराव क्रमांक २१ दि.०७/१२/ २०१७ बॅडमिंटन हॉल नामकरण बाबत झालेल्या ठरावाची **अंमलबजावणी/ मान्यता बाजूने मतदान करण्यात यावे. तसेच** कार्यपत्रिका क्रमांक ०५ ठराव क्रमांक २१ दि.०७/१२/ २०१७ बॅडमिंटन हॉल नामकरण बाबत झालेल्या ठरावाची **अंमलबजावणी करु नये /** अमान्य/ रद्द करणेबाबत मतदान करण्यात यावे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ चे १ (र) अन्वये सदर विषयाबाबत निर्णय घेणेत येईल.

**मा.सागर गवळी –** मतदान घेण्यासाठी थोडा वेळ देण्यात यावा.

**मा.अजित गव्हाणे –** एखादया ठिकाणी नाव देताना काही प्रशासनाचे धोरण आहे का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** कुठल्याही प्रकारच्या वास्तुला नांव देताना महापुरुष राष्ट्रीय संत, महात्मा, तसेच खूप नावाजलेले खेळाडू यांचे नामकरण करण्यात यावे असे मागील मासिक सभेमध्ये चर्चा करुन त्यास संमती देण्यात आली होती.

**मा.अजित गव्हाणे -** प्रभागामध्ये नामकरणाबाबत लिमिटेड पॉवर दयावी. पक्षनेते, विरोधी पक्षनेते पॉलीसी असली पाहिजे. नाव देण्यावरुन वाद होतात. खूप मोठया वास्तूला छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव देण्यात यावे.

**मा. विकास डोळस -** सागर गवळी यांचेकडून जो नामकरणाचा विषय आलेला आहे त्याला माझा पुर्ण पार्ठिबा आहे. गवळी कुटूंबियांनी पी.सी.एम.सी.ला जागा दिलेली आहे.  पी.सी.एम.सीच्या विकासामध्ये स्थानिक लोकांनी अतिशय त्रास व त्याग केलेला आहे हे इतिहासात आहे. त्यामुळे स्थानिक माणसांचेच नाव देण्यात यावे. मला माझे मत मांडण्याचा पुर्ण अधिकार आहे. सागर गवळीच्या मताशी मी शंभर टक्के सहमत आहे.  तरी हा ठराव मंजूर करण्यात यावा.

**मा.सागर गवळी -** ५.१० मिनीटांचा वेळ देण्यात यावा.

**(१० मिनीटे वेळ घेतल्यावर मतदान घेण्यात आले.)**

मतदान घेण्यात आले त्यानुसार **ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी १ मतदान झाले आहे. व ठरावाची अंमलबजावणी करु नये यासाठी ९ मतदान झाले आहे.**

**मा.सभापती – भिमाबाई पोपट फुगे – सदरचा ठराव १ विरुध्द ९ मताने रद्द करण्यात येत आहे.**

------

ठराव क्रमांक - **२७** विषय क्रमांक- ३

दिनांक- - **०७/१२/**२०१८

सूचक- मा.विकास डोळस अनुमोदक – मा.संतोष (अण्णा) लोंढे

संदर्भ –मा.सागर बाळासाहेब गवळी, नगरसदस्य यांचे दिनांक २६/११/२०१८ रोजीचे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीच्या मासिक सभेमध्ये ठराव क्रमांक २१ दिनांक ७/१२/२०१७ रोजीच्या नामकरणाचा ठराव रद्द करुन प्रभाग क्रमांक ५ येथील बॅडमिंटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करणेत यावे. सदरची जागा गवळी कुटुंबियांनी दिलेली आहे. तरी स्थानिक भूमिपुत्रांना न्याय देण्याच्या भावनेने त्यांनी दिलेल्या जागेबद्दल ऋण व्यक्त करुन सदर बॅडमिटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - **२८** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०७/१२/**२०१८

सूचक- मा. घुले नानी उर्फ हिराबाई अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

संदर्भ- मौजे डुडूळगांव ता.हवेली मधील गट नं. १९० मधील वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील १८.मी.व २४ मी.रुंद रस्त्याने बाधीत ०.७७४ हेक्टर वनजमिन महानगर- पालिकेच्या ताब्यात घेणेबाबत नगररचना व विकास विभागाकडील पत्र क्र. नरवि/कावि/ १५/४१८/२०१८, दिनांक ३०/११/२०१८ चे पत्र.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेमधील मौजे डूडूळगांव, ता.हवेली मधील गट नं. १९० मधील ०.७७४ हेक्टर वनजमिन २४ मी. रुंद रस्त्याने बाधित होत असून सदरची रस्ता बाधित वन जमिन रस्ते विकसनासाठी वनसंवर्धन कायदा १९८० अंतर्गत महानगर- पालिकेच्या ताब्यात घेणे आवश्यक आहे. त्यासाठी मौजे डूडुळगांव, ता.हवेली मधील गट नं.१९० मधील वाढीव हद्दीच्या मंजूर विकास योजनेतील २४ मी.रुंद रस्त्याने बाधित ०.७७४ हेक्टर वनजमिन वनसंवर्धन कायदा १९८० अंतर्गत महानगरपालिकेच्या ताब्यात घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

**------**

ठराव क्रमांक - **२९** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०७/१२/**२०१८

संदर्भ- प्रभाग क्र.५ मधील बॅडमिंटन हॉलला श्री.छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल असे नामकरण करणेबाबत. मा.सौ.प्रियांका प्रविण बारसे यांचे जा.क्र.१२०, दि.४/१२/ २०१८ चे पत्र.

या महिन्याच्या ०७/१२/२०१८ रोजी होणा-या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या मासिक सभेमध्ये, विषय क्रमांक ३ अन्वये प्रभाग क्रमांक ५ मधील बॅडमिंटन हॉलला कै. शंकर परशुराम गवळी यांचे नामकरण ठराव मंजूर करुन सभावृत्तात कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही करण्यात यावे

असे लिहिले आहे. पण ही पध्दत पुर्ण चुकीची आहे. माझे पत्र जा.क ११९ दिनांक ०४/१२/२०१८ नुसार मी माझा आक्षेप नोंदविला आहे. दिनांक ०७/१२/२०१७ च्या इ क्षेत्रीय कार्यालयाच्या मासिक सभेमध्ये बॅडमिंटन हॉलला कै. सु.ना.बारसे बॅडमिंटन हॉल असे नामकरण करण्याचा ठराव मंजूर होऊन तो दिनांक ०४/०१/२०१८ च्या मासिक सभेमध्ये कायम करण्यात आला. पण दि.०७/०२/२०१८ च्या दिलेल्या पत्रानुसार श्री.सागर गवळी यांनी आक्षेप घेतला. या आक्षेपाची पत्र आमच्या कार्यालयापासून लपवून ठेवले असा आमचा स्पष्ट आरोप आहे. त्यांनी येणा-या मासिक सभेमध्ये कै. शंकर परशुराम गवळी असे नाव सुचविले आहे. या नावाचा ठराव या आधीच्या कोणत्याही मासिक सभेमध्ये घेतलेला नाही. त्यामुळे दोन्ही कुटूंबात व नगरसेवकात होणारा संभाव्य संघर्ष टाळण्यासाठी व नातेसंबंधातील भावनीक वातावरण खराब होऊ नये यासाठी बॅडमिंटन हॉलचे **श्री.छत्रपती शिवाजी महाराज बॅडमिंटन हॉल** असे नामकरण करण्यात यावे व सर्वामधील वाद टाळावा. सदर बॅडमिंटन हॉलला ठराव क्रमांक **– २७**, विषय क्रमांक- ३, दिनांक- - **०७/१२/**२०१८ **अन्वये कै. शंकर परशुराम गवळी असे नामकरण करणेत** आले असल्याने **सदरचा विषय दप्तरी दाखल करण्यात आला आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक **- ३०** विषय क्रमांक- ३

दिनांक- - **०७/१२/**२०१८

सूचक- मा.सुवर्णा बुर्डे अनुमोदक – मा. विकास डोळस

संदर्भ- प्रभाग क्र.४ दिघी-बोपखेल मधील बोपखेल स्मशानभुमी मधील मोडकळीस आलेले FRP Toilet unit निष्कासित करणेबाबत.मा.सौ.हिराबाई (नानी) गोवर्धन घुले यांचे दिनांक ०७/१२/२०१८ रोजीचे पत्र**.**

बोपखेल येथील स्मशानभुमीमध्ये सार्वजनिक वापरासाठी FRP Toilet unit बसविण्यात आलेले आहेत. तथापि, सदरचे FRP Toilet unit हे अनेक वर्ष जुने झाले असल्याने तसेच ब-याच ठिकाणी झीज होऊन मोडकळीस आलेले आहे. त्यामुळे नागरी वापरही बंद झालेला आहे. सबब, बोपखेल स्मशानभूमी मधील मोडकळीस आलेले FRP Toilet unit निष्कासित करावे व सदर ठिकाणी नवीन RCC Toilet unit बांधणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक **- ३१** विषय क्रमांक- ४

दिनांक- - **०७/१२/**२०१८

सूचक- मा. घुले नानी उर्फ हिराबाई अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

संदर्भ- प्रभाग क्र.३ मोशी येथील पुणे-नाशिक ते गट क्र. ५० कडे जाणारा रस्त्यास **"शिवाजी वाडी मार्ग क्र.२"** असे नामकरण करणेबाबत.मा.सुवर्णा विकास बुर्डे यांचे दिनांक ०७/१२/२०१८ चे पत्र.

वरील विषयान्वये प्रभाग क्र.३ मोशी येथील पुणे नाशिक ते गट क्र.५० कडे जाणारा रस्त्यास **"शिवाजी वाडी मार्ग क्र.२"** असे नामकरण करणेस मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - ३२ विषय क्रमांक- ५

दिनांक- - ०७/१२/२०१८

सूचक- मा.संतोष (आण्णा) लोंढे अनुमोदक – मा.अजित गव्हाणे

संदर्भ- प्रभाग क्र. ५ मधील आरक्षण क्र. ३९८ खेळाचे मैदान व १२.०० मी रुंद रस्त्यास येणारे बांधकाम निष्कासित करणेबाबत.मा.श्री.सागर बाळासाहेब गवळी,मा.श्री.अजित गव्हाणे, व मा.सौ.प्रियांका बारसे यांची दि.७/१२/२०१८ ची पत्रे.

भोसरी प्रभाग क्र.५ संत तुकारामनगर मधील आरक्षण क्र.३९८ खेळाचे मैदान व १२.०० मी.रुंद रस्त्यात असलेले बांधकाम पाडावे कारण वाहतुकीस ये-जा करणेस व रस्ता अरुंद असल्याने तेथील राहणा-या नागरीकांना गाडया चालविण्यास अडथळा होत आहे म्हणून बांधकाम पाडून रस्ता रुंद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

**मा. अध्यक्षा -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/३३९/२०१८
दिनांक- १४/१२/२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी

सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

-------

**दिनांक- शुक्रवार दिनांक ७/१२/२०१८ सकाळी ११.०० वा. झाली. सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.प्रियांका बारसे –** पैसे द्या व वापरा तत्वावर  या संस्थेस देखभाल करण्यासाठी देणार आहे त्यावर काय लिहणार आहे.? त्यांचेकडून साफसफाईची कामे होणार का?

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी)** – करारनामा स्थापत्य विभागाकडून करणार आहे. शौचालय स्वच्छ राहावे म्हणूनच संस्थेला करारनामा करुन चालविण्यास देणार आहोत.  सर्व जबाबदारी संस्थेची राहील. भोसरी पुलाखालील  शौचालय  ज्या संस्थेला चालवायला दिले आहे त्याच संस्थेकडे हे शौचालय पे आणि युज या तत्तवावर दिले आहे.

**मा.अजित गव्हाणे -** पे आणि युज या तत्तवावर शौचालय चालविण्यास देण्याबाबत करारनामा करणार आहे. त्या शौचालयामध्ये किती  बाथरुम आहे? सर्व देखभाल करणार आहेत का?

**श्री.प्रभाकर तावरे –(सहा.आरोग्याधिकारी)** –   शौचालयाची देखभाल व स्वच्छता करण्यासाठी केअर टेकर गरजेचे आहे.  स्थापत्य विभागाकडून करारनामा करताना  सर्व गोष्टी त्यामध्ये येणार आहे.

**मा.प्रियांका बारसे –** दर हे साधारण सगळीकडे आहे तसेच आहेत का?

**श्रीमती शिनकर मॅडम – (उपअभियंता स्थापत्य) –** दर हे पाच रुपये, दोन रुपये असे आहेत. सगळीकडे  आहेत त्याचप्रमाणे दर ठेवणार आहे.

**मा.सुवर्णा बुर्डे –** च-होली येथे ४,५ दिवस झाले पाणी गढूळ येत आहे.

**श्री.कोतकर – (क.अभियंता पाणीपुरवठा) –** मला आता अप्पांचा फोन आला होता. गढूळ पाणी येते ते मला माहित नाही. अनाधिकृत नळ कनेक्शन अधिकृत करीत नाही. माहिती पडल्यावर लगेच पाहणी करण्यात येते.

**मा.सुवर्णा बुर्डे –** आता मिटींग झाल्यावर लगेच माझेबरोबर  पाहणी करण्यासाठी या. आता मिटींग चालू असताना मला तेथील महिलांचे गढूळ पाण्याबद्दल फोन आले आहेत.

**मा.विकास डोळस -** गढूळ पाण्याबाबत माहित नाही.  माहिती पडल्यावर जातो. अशी उत्तरे दयायची नाही.  नगरसेवकांशी बोलताना नीट बोलायचे.

**मा.सागर गवळी** – पाणीपुरवठा हा सगळीकडे व्यवस्थित करण्यात यावा. लोकांना विश्वासात घेऊन नळकनेक्शन अधिकृत करुन घ्यावे.  ज्या लोकांकडून दंड घेणार आहे तो नियमानुसार घेण्यात यावा.

**श्री.बेळगांवकर (क.अभियंता पाणीपुरवठा)**  – अनाधिकृत नळकनेक्शन असतील तर दंड घेण्यात येईल. अधिकृत करणेबाबत लोकांनी सांगितले आहे.

**मा.प्रियांका बारसे –** आमचे येथे कॉलनीमध्ये नवीन पाण्याची पाईप लाईन टाकणेचे काम करणे. तसेच तुकाईनगर येथे ड्रेनेज लाईनचे काम करुन घ्यावे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी – सर्व शाखाप्रमुख यांनी आपले विभागाशी संबंधीत झिरो पेंडेन्सी, अभिलेख वर्गीकरण, लेखापरीक्षण आक्षेप पुर्तता इ. बाबत व्यक्तीश: लक्ष घालून पूर्तता करण्यात यावी. माहे ३१ डिसेंबर २०१८ अखेर याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन पूर्तता अहवाल प्रशासन विभागास सादर करावा. मा.शेख सो. अभिलेख कक्ष प्रमुख यांनी अभिलेख वर्गीकरणाचे प्रशिक्षण  सर्व कर्मचा-यांना दिलेले असून याबाबत काही अडचणी असल्यास मा.शेख सो.अभिलेख कक्ष प्रमुख यांचेशी संपर्क साधावा. याकामी दिरंगाई अपेक्षीत नाही.**

मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

-------